# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ (१९९४ च्या महा. ३५) च्या कलम ३ च्या पोट कलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ ( सन २०१७ चा महाराष्ट विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६ ) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

एम. आय डी सी रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५ E-mail- **college.section@unigug.ac.in**


जा.क्र./गोविग/मविविवि/ 784 /२०२५ दि.: 01/०७/२०२५

## परिपत्रक

**विषय: महाविद्यालयातील अध्यापकांच्या कॅरिअर ॲडव्हांसमेंट स्किम (कॅस) अंतर्गत आयोजित कॅम्पमध्ये प्रस्ताव सादर करण्याबाबत.**

संदर्भ: विद्यापीठाचे पत्र क्रमांक गों.वि./म.वि.वि.वि./२९१४, दि. २५/०७/२०२४.

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, संदर्भीय परिपत्रकान्वये महाविद्यालयातील अध्यापकांचे कॅरिअर ॲडव्हांसमेंट स्किम (कॅस) बाबतची प्रकरणे महाविद्यालयांकडून विनाविलंब निकाली काढण्याबाबत सुचित करण्यात आले होते. त्याअनुषंगाने मा. व्यवस्थापन परिषदेमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार महाविद्यालयातील अध्यापकांचे कॅरिअर ॲडव्हांसमेंट स्किम (कॅस) अंतर्गत स्थाननिश्चितीबाबत महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेल्या प्रस्तावांवर तात्काळ कार्यवाही घेऊन सदर प्रस्ताव विद्यापीठामध्ये सादर करावा. जेणेकरुन विद्यापीठामार्फत समिती गठीत करण्याबाबतची कार्यवाही घेणे सोयीचे होईल.

जे महाविद्यालय अध्यापकांच्या प्रलंबित कॅरिअर ॲडव्हांसमेंट स्किम (कॅस) बाबत स्थाननिश्चिती समिती गठीत करण्याबाबतचे प्रस्ताव विद्यापीठामध्ये सादर करणार नाही अशा महाविद्यालयांवर/संस्थेवर विद्यापीठाकडून तसेच शासनाकडून कार्यवाही झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित संस्थेचे अध्यक्ष/सचिव व प्राचार्य यांची राहील. याबाबतची संपूर्ण नियमावली संलग्न केली आहे.

मा. प्र-कुलगुरु यांच्या मान्यतेनुसार

(श्री. दिनेश नरोटे)
**सहाय्यक कुलसचिव**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**प्रति:**

**मा. प्राचार्य, गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये.**

# विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील अध्यापकांचे कॅस अंतर्गत पदोन्नतीकरिता कॅम्प आयोजित करण्याबाबतची नियमावली

१. विद्यापीठाशी संलग्नित विविध महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक, ग्रंथपाल, शारीरीक शिक्षण निर्देशक यांच्या कॅस अंतर्गत पदोन्नती कोणत्या टप्प्यावर रखडलेली आहे. याबाबतची माहिती महाविद्यालयाकडुन प्राप्त करुन घेणे.
२. कॅस अंतर्गत पदोन्नती देण्यासाठी पात्र अध्यापकांची यादी संलग्नित महाविद्यालयाकडुन प्राप्त करून घेणे.
३. कॅस अंतर्गत पदोन्नती देण्यासाठी पात्र अध्यापकांची यादी संलग्नित महाविद्यालयाकडुन प्राप्त झाल्यानंतर कॅस अंतर्गत पदोन्नतीकरिता योग्य प्रस्ताव तयार करुन विद्यापीठाकडे सादर करण्याबाबत महाविद्यालयांना कळविणे.
४. सदर प्रस्ताव सादर करित असतांना महाविद्यालयांच्या IQAC समितीकडुन रितसर तपासणी करुन व महाविद्यालयाच्या महाविद्यालय विकास समिती (CDC) च्या मान्यतेने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १८ जुलै २०१८ च्या विनियमानुसार व शासन निर्णय दिनांक ८ मार्च २०१९ नुसार सदर प्रस्ताव ३ महिन्यापुर्वी विहीत प्रपत्रात विद्यापीठाकडे सादर करण्याबाबत महाविद्यालयांना सुचित करणे.
५. कॅस अंतर्गत शिबिराकरिता येणाऱ्या खर्चासाठी महाविद्यालयांनी प्रति प्रस्ताव शुल्क खालीलप्रमाणे सादर करावे.
   अ) चहा, नास्ता, जेवण, पाणी इत्यादीचा संपूर्ण खर्च महाविद्यालयाने करावा.
   ब) Expert sitting allowance प्रति विषयतज्ञ रुपये १०००/- प्रमाणे गणना करावी.
   क) सभेला उपस्थित शासकिय अधिकारी मा. कुलगुरु नामीत प्रतिनिधी, विषयतज्ञ यांचे प्रवास करण्याचे ठिकाणापासुन ते कॅम्प स्थळी उपस्थित राहण्यासाठी जाणे-येणे करिता प्रति व्यक्ती प्रति कि. मी. रुपये १२ /- प्रमाणे गणना करावी.

६. वरिल नमुद अ, ब व क मधील येणाऱ्या शुल्काची गणना करुन त्यानुसार येणारी एकुण रक्कम विद्यापीठात जमा करावी व प्रस्ताव सादर करतेवेळेस जमा रकमेची पावती प्रस्तावासोबत जोडण्यात यावी.
७. कॅस अंतर्गत पदोन्नती देण्यासाठी अध्यापकांचे प्रस्ताव महाविद्यालयाकडुन विद्यापीटास प्राप्त झाल्यानंतर प्रत्येक वर्षात दोन महिन्यातुन एकदा शिबीराचे आयोजन करण्यात येईल.
८. कॅस अंतर्गत पदोन्नती शिबिराकरिता विद्यापीठाव्दारे मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपुर विभाग, नागपुर व सह. आयुक्त सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, चंद्रपुर आणि गडचिरोली जिल्हा यांच्याशी संपर्क, पत्रव्यवहार करुन आणि चर्चा करुन शिबिराची दिनांक अंतिम करण्यात यावी.
९. कॅस अंतर्गत पदोन्नती शिबिराकरिता मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपुर विभाग, नागपुर व सह. आयुक्त सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, चंद्रपुर आणि गडचिरोली जिल्हा यांच्या व विषयतज्ञ यांच्या चहा, नास्ता आणि भोजनाची व्यवस्था विद्यापीठाकडुन करण्यात येईल. तसेच आवश्यकतेनुसार वरिल अधिकारी व विषयतज्ञ यांच्या निवासाची व्यवस्था विद्यापीठाव्दारे करण्यात येईल व निवासाकरिता येणारा प्रत्यक्ष खर्च संबंधित महाविद्यालयाला करणे क्रमप्राप्त राहिल.
१०. विद्यापीठाव्दारे आयोजित कॅस अंतर्गत पदोन्नती शिबिरामध्ये विद्यापीठ अनुदान आयोग व शासन निर्णयातील समिती रचनेनुसार लेवल- ११ व लेवल -१२ करिता संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच लेवल १३A व १४ करिता संबंधित महाविद्यालयाच्या संस्थेचे अध्यक्ष अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले प्रतिनिधि यांची प्रत्यक्षात उपस्थिती असणे अनिवार्य राहिल. महाविद्यालयाकडुन प्राप्त प्रस्तावाचे कार्यालयीन कामकाजाकरिता महाविद्यालयातील लिपीक व समकक्ष कर्मचारी व एक चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांना उपस्थित राहणे आवश्यक राहिल.
११. कॅस अंतर्गत पदोन्नती शिबिराकरिता आवेदकांना विद्यापीठामध्ये सादर केलेल्या मुळ प्रस्तावाच्या Soft copy आणि Hard Copy च्या प्रति सोबत शिबिराच्या दिवशी वेळेवर विद्यापीठात उपस्थित राहणे अनिवार्य राहिल.
१२. महाविद्यालयाला वेळेवर कोणत्याही कागदपत्रांची पुर्तता करता यावी याकरिता किंवा प्रस्तावामध्ये अधिकाऱ्यांनी वा विषयतज्ञांनी सुचविलेल्या बदलांप्रमाणे लगेच प्रत सादर करता येईल यासंबंधाने संपूर्ण दस्तदेवज पुरविण्याची जबाबदारी महाविद्यालयाची राहील.
१३. कॅस अंतर्गत पदोन्नती शिबिरामध्ये उपस्थित होणारे आवेदक, संस्थेचे प्रतिनिधी, प्राचार्य, लिपीक आणि चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना कोणतेही मानधन अथवा भत्ते विद्यापीठाकडुन देय असणार नाही.
१४. विद्यापीठातआयोजित कॅम्प मार्फत कॅस पदोन्नती करुन घेण्यासाठी महाविद्यालयाकडुन प्रस्ताव सादर करणे हे ऐच्छिक स्वरुपाचे राहील.